# प्रकरण सहावे

# उपसंहार

# प्रकरण सहावे

## उपसंहार

"संध्या देशपांडे यांच्या 'अश्वदा' कादंबरीचा अभ्यास" या लघुप्रबंधामध्ये प्रकरण पहिले 'मराठी कादंबरीचा उदय आणि विकास' हे आहे. या प्रकरणामध्ये मराठी कादंबरीची पूर्वपीठिका सांगितली आहे. इ.स. १८१८ नंतर पेशवाईचा अस्त झाला. इंग्रजांची राजवट भारतात आली. त्यापूर्वी भारतात शिक्षणाचा प्रसार झाला नव्हता. सर्व लोक अशिक्षित असलेले दिसून येतात. इंग्रजांची राजवट आल्यानंतर त्यांनी शिक्षणाचा प्रसार केला. लोकांना शिक्षण देण्यास सुरूवात केली. मुद्रणाची सोय उपलब्ध केली. त्यामुळे मराठी गद्याचे अभिव्यक्तिसामर्थ्य दिवसेंदिवस वाढत गेले. शिक्षणाच्या प्रसारामुळे वाचकांची संख्या वाढू लागली. लोक लिखाणाकडे वळू लागले. वाचनाची गोडी लागली. म्हणून शिक्षणक्रमात काव्यात्म वाङ्मयाचा समावेश केला जात असे. शिक्षणखाते देखील काव्यात्म वाङ्मयाच्या अनुवादित, रूपांतरीत आणि स्वतंत्र निर्मितीला प्रोत्साहन देत होते. त्यातूनच कादंबरीचा उदय कसा झाला याची पार्श्वभूमी मांडण्यात आली आहे. कादंबरी वाङ्मयाचा उगम इंग्रजी वाङ्मयाच्या अनुकरणातून झाला. कादंबरी वाङ्मयप्रकार लोकांना आवडू लागल्यानंतर अनेक कादंबऱ्या प्रसिद्ध होऊ लागल्या. ब्रिटिश काळात पाश्चात्य संस्कृतीचा हिंदू संस्कृतीशी संयोग झाला. त्यातूनच बाबा पद्मनजी यांनी इ.स. १८५७ मध्ये 'यमुनापर्यटन' ही मराठीतील पहिली कादंबरी लिहीली. इ.स. १९६१ मध्ये लक्ष्मणशास्त्री हळबे यांनी 'मुक्तामाला' नावाची अद्भुतरसप्रधान कादंबरी लिहिली. कादंबरीचा उदय होण्यास कोणकोणत्या गोष्टी कारणीभूत ठरल्या आहेत त्यांचा उल्लेख या प्रकरणामध्ये केला आहे. विविध समीक्षकांच्या मतांचा देखील येथे विचार केला आहे.

कादंबरीच्या उदयाबरोबर कादंबरीच्या समीक्षकांनी दिलेल्या विविध व्याख्यांचा उल्लेख केला आहे. त्यामध्ये जाधव यांनी कथानक, व्यक्तिचित्रण, लेखकाचा दृष्टिकोन

BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

व यांना अनुरूप अशी निवेदन तंत्रे, वर्णने, वातावरण निर्मिती, शैली इ. घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव. जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय. अशी परिपूर्ण व्याख्या केली आहे. कादंबरीचा विकास कसा झाला ते नमूद केले आहे. कादंबरीचा विकास १९५० ते १९८० या काळात विविधांगी विकास झाला. उदा. प्रचारात्मक, वैचारिक, कलात्मक इ. या विकासासाठी अनेक कादंबरीकारांनी आपले योगदान दिले व त्यातूनच विकासाचे विविध टप्पे पाडण्यात आले. एकंदरीत कादंबरी या वाङ्मयप्रकाराचा आजवरचा इतिहास पाहता त्याची प्रकृती समाजाच्या वास्तवाशी निगडीत अशीच राहिली आहे. कादंबरी साहित्याचा विकास अखंडपणे सुरू आहे आणि त्यात नवनवीन विषयांची भर पडत आहे.

कादंबरीच्या विकासाबरोबर कादंबरीचे स्वरूप याचा विस्तृतपणे अभ्यास केला आहे. कादंबरी वाङ्मयप्रकार महाकाव्यासारखा आहे हे फिल्डींगचे मत सार्थ आहे. कादंबरीमध्ये एखाद्या देशातील लोकसमूहाचे विस्तृत स्वरूपाचे जीवन चित्रण केलेले असते. यात लेखकाची जीवनदृष्टी महत्त्वाची असते. या जीवनदृष्ट्या व्यापकतेवर या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप विस्तृत व सखोल आहे. कादंबरीचे स्वरूप हे कथानक, व्यक्तिचित्रण, वातावरणनिर्मिती, भाषाशैली, निवेदनपद्धती, संवाद या गोष्टींवर अवलंबून असते. कादंबरीमध्ये हे सर्व घटक महत्त्वाचे ठरतात याचा अभ्यास या प्रकरणामध्ये केला आहे. तसेच पौराणिक कादंबरी आणि महाभारत यांचा संबंध, पौराणिक कादंबरीची वाटचाल, पौराणिक कादंबऱ्या व त्यातील प्रमुख व्यक्तिरेखा यांचा थोडक्यात अभ्यास करण्यात आला आहे.

**प्रकरण दोन :-**

संध्या देशपांडे यांच्या वाङ्मयीन व्यक्तिमत्त्वाचा परिचय करून घेण्यात आला आहे. हा परिचय करून घेताना त्यांचा जन्म, बालपण, शिक्षण, विवाह, स्वभावविशेष,

कादंबरी, नाटक बालवाङ्मय, चरित्र, दीर्घकाव्य, एकांकिका, अनुवादित साहित्य इ. लेखन प्रकार, त्यांना मिळालेले पुरस्कार, सामाजिक-शैक्षणिक कार्य या घटकांचा विचार केला. इ.स. १९८५ पासून त्यांनी लेखनाला सुरूवात केली. विविध साहित्यप्रकार हाताळून त्यांनी विपुल लेखन केले.

संध्या देशपांडे यांचा नाटक हा आवडता विषय आहे. त्यासाठी त्यांनी अनेक नाटके लिहून त्यांचे प्रयोग स्वत: स्थापन केलेल्या 'नाट्यांकुर' संस्थेतर्फे केले आहेत. त्याचबरोबर त्यांनी अनेक भाषांतरीत नाटके लिहून त्यांचे प्रयोग केले आहेत. पथनाट्ये लिहून त्यातून सामाजिक प्रबोधन करण्याचा प्रयत्न केला आहे.

**प्रकरण तीन :-**

प्रस्तुत प्रकरणात माधवीच्या जीवनाच्या संघर्षाचे विवेचन केले आहे. ययाती कन्या माधवीच्या जीवनाची शोकांतिका मन उद्विग्न करते. ययातीकन्या माधवीला दानात अर्पण केले जाते. गुरूदक्षिणा पूर्ण करण्यासाठी दोनशे अश्वांच्या बदल्यात एक पुत्र असा तीन राजांकडे तिचा विनिमय करावा लागतो. पुत्रप्राप्तीनंतर कौमार्य तसेच राहील हा तिला मिळालेला वर तिच्यासाठी शापच ठरलेला दिसून येतो. चार पुत्रांची माता होऊनदेखील तिला आपल्या पुत्रांपासून दूर जावे लागते. त्यामुळे तिची तडफड कशी होते व यासर्व गोष्टींना पुरूषच जबाबदार असतो. तो आपला स्वार्थ साधत कसा अलिप्त राहतो याचे चित्रण केले आहे.

'अश्वदा' मधील व्यक्तिरेखा आणि त्यांचा विविध पातळ्यांवर चाललेला संघर्ष मांडला आहे. संवादाच्या माध्यमातून पात्रांची वैशिष्ट्ये व स्वभावचित्रण केले आहे. माधवीला जीवन जगताना करावा लागणारा संघर्ष अत्यंत मनोज्ञतेने मांडला आहे. कादंबरीतील स्त्री शांत, संयमी, सहनशील, परंपरावादी, समंजस, निस्वार्थी प्रेम करणारी आज्ञाधारक, बुद्धिमान, चतुर, त्यागीवृत्ती असणारी, प्रसंगी कठोर इत्यादी वैशिष्ट्ये असलेली

तर पुरूष स्वार्थी, अहंकारी, प्रतिष्ठा जपणारा, वर्चस्व गाजविणारा, पुरूषी वासना जोपासणारा, ज्ञानासाठी धडपडणारा, आधुनिक विचारसरणीचा, अंधश्रद्धेला विरोध करणारा इत्यादी वैशिष्ट्ये असलेला दिसतो.

तत्कालीन स्त्रियांचे जीवन, वास्तव व कल्पित अनुभव विश्व, गुरूदक्षिणा पूर्ण करण्यासाठी माधवीला व गालवाला करावा लागलेला संघर्ष, इतर व्यक्तिरेखांचा जीवनसंघर्ष वाचकांच्या मनाला अस्वस्थ करून जातो. प्रत्येक व्यक्तीचे आगळे-वेगळे स्वभाववैशिष्ट्य मर्मग्राही, हृदयस्पर्शी आहे. या सर्व गोष्टींचा ऊहापोह या प्रकरणामध्ये केला आहे.

**प्रकरण चौथे :-**

प्रस्तुत प्रकरणात आपण 'अश्वदा'मधील तत्कालीन स्त्री-मनाची व्यथा-वेदनांचा अभ्यास केला आहे. गुरूदक्षिणा पूर्ण करण्यासाठी माधवीची कशी फरफट होते हे चित्रित केले आहे. तसेच पतीच्या प्रेमाला वंचित झालेली चित्रलेखा, प्रेमासाठी याचना करणारी रंभा, पुत्रमोह असलेली दृषव्दती, पुत्राचा बळी जातो आहे हे पाहणारी शुन:शेपाची आई, पतीला विरोध करता न येणारी शीलवती अशा अनेक स्त्रियांच्या दु:खाला वाचा फोडण्याचे काम यात केले आहे. तत्कालीन गुरू-शिष्य संबंध कसे होते याचा अभ्यास केला आहे. गालव, सहदेव व विश्वामित्र यांच्यात एक प्रकारचा जिव्हाळा, प्रेम, आत्मियता, विश्वास होता. गुरू पतीपत्नी आश्रमातील शिष्यांवर माता-पित्याप्रमाणे प्रेम करत. ज्ञानदानाबरोबर सामाजिक व्यवहाराचीही ओळख करून देत. आपल्या शिष्याने आपल्यापेक्षा श्रेष्ठ व्हावे असे गुरूला वाटत असे.

कादंबरीच्या माध्यमातून तत्कालीन समाजातील रूढी, परंपरा, संस्कृती यांचा अभ्यास यामध्ये करण्यात आला आहे.

**प्रकरण पाचवे :-**

प्रस्तुत प्रकरणात 'अश्वदा' कादंबरीचे वाङ्मयीन मूल्यमापन केले आहे. वाङ्मयीन मूल्यमापन करत असताना कथासूत्र, पात्रे, संवाद, भाषाशैली, शीर्षक, उद्देश यांचा वापर करून कादंबरीचा वाङ्मयीनदृष्ट्या अभ्यास करण्यात आला आहे. लेखिकेशी प्रत्यक्ष चर्चा करून कादंबरी लिहिण्यामागचा उद्देश स्पष्ट केला आहे. कादंबरीचे शीर्षक आशयाला साजेसे आहे. त्यामुळे कादंबरी वाङ्मयीनदृष्ट्या महत्वपूर्ण ठरली आहे.

अशाप्रकारे वरील पाच प्रकरणामध्ये विविध गोष्टींचा अभ्यास करण्यात आला आहे. त्याचबरोबर प्रत्येक प्रकरणाच्या शेवटी प्रकरणामध्ये जे संदर्भ वापरले आहेत. त्या संदर्भाची संदर्भ सूचीमध्ये माहिती देण्यात आली आहे.

प्रकरण सहामध्ये म्हणजेच या प्रकरणामध्ये वरील पाच प्रकरणांचा निष्कर्ष मांडण्यात आला आहे. या प्रकरणानंतर ज्या संदर्भ पुस्तकांचा वापर करण्यात आला आहे. त्याची सूची दिली आहे. त्यानंतर लेखिकेची मुलाखत, फोटो व अभिप्राय प्रबंधाच्या शेवटी जोडण्यात आला आहे.

अशाप्रकारे 'अश्वदा' कादंबरीचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला आहे.

# संदर्भ ग्रंथ सूची

## संदर्भग्रंथ सूची

१) अत्रे प्र.के. - मृत्युचे चुंबन घेणारा महाकवी सानेगुरूजी, साधना प्रकाशन, पुणे ३०, १९७३.

२) कुरूंदकर नरहर - धार आणि काठ, देशमुख आणि कंपनी, पुणे, आवृत्ती चौथी, १९९८.

३) कुलकर्णी श्री.मा. - कादंबरीची रचना, उन्मेश प्रकाशन, आवृत्ती पहिली, १९५२.

४) कुलकर्णी वा.ल. - साहित्य : शोध आणि बोध, आवृत्ती दुसरी, १९७५.

५) कुलकर्णी विठ्ठल हरी - अर्वाचीन मराठी साहित्य, १८७५ - १९०५.

६) गाडगीळ गंगाधर - साहित्याचे मानदंड, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, आवृत्ती पहिली.

७) गोखले उषा - य.ग. जोशी जीवन आणि वाङ्मय, पुणे, १९८७.

८) जाधव रा.ग. - मराठी विश्वकोश, खंड - ३, संपा-लक्ष्मणशास्त्री जोशी, म.रा.सा.सं. मंडळ, मुंबई, आवृत्ती पहिली.

९) जोग ल.ग.- कादंबरी, जोशी-लोखंडे ग्रंथ प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, १९६३.

१०) जोग ल.ग. - महाराष्ट्रातील वाङ्मयीन प्रवाह कादंबरी, आवृत्ती पहिली, १९६३.

११) त्रिवेदी विष्णूप्रसाद - लेखवाङ्मयेतिहासाची मीमांसा, अनु. मेधा सिद्धये, आलोचना, १९८६

१२) डहाके वसंत आबाजी - गेल्या अर्धशतकातील पौ. व ऐ. लेखनाची फलश्रृती, संपा. विलास खोले, लोकवाङ्मय गृह मुंबई, आवृत्ती पहिली, २००२.

१३) दांडेकर शं.वा. (संपा) - महाभारतातील थोर स्त्रिया, प्रका. शं.वा दांडेकर, ९७४, सदाशिव पेठ, पुणे, आवृत्ती पहिली, १९६३

१४) देशपांडे संध्या - अश्वदा, मेनका प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, २००६.

१५) देशपांडे कुसुमावती - मराठी कादंबरीचे पहिले शतक, मराठी साहित्य संघ प्रकाशन, मुंबई, चौथी आवृत्ती.

१६) नेमाडे भालचंद्र-टीकास्वयंवर, साकेत प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, १९२०.

१७) फडके ना.सी. - लघुकथा : मंत्र आणि तंत्र, मुंबई, १९५२.

१८) बापट प्र.वा., गोडबोले ना.वा. - मराठी कादंबरी तंत्र आणि विकास, व्हीनस प्रकाशन पुणे, आवृत्ती दुसरी, १९५७.

१९) बांदिवडेकर चंद्रकांत - मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, आवृत्ती पहिली, १९८९.

२०) भिडे श्री.र. - महाभारताचे वरदान, खंड-१, राजहंस प्रकाशन, पुणे, आवृत्ती पहिली, १९९५.

२१) भिडे श्री.र. - महाभारताची शापवाणी, प्रका. भिडे शां.श्री., कोथरूड, पुणे.

२२) मुजुमदार गो.गो. - मराठीची सजावट, भाग २ रा.

२३) मुखर्जी मीनाक्षी - तौलनिक साहित्याभ्यास : तत्त्वे आणि दिशा, संपा. चंद्रशेखर जहागीरदार, सौरभ प्रकाशन, कोल्हापूर, आवृत्ती पहिली, १९९२.

२४) सप्रे अविनाश - स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी प्रवृत्ती आणि प्रवाह, प्रदक्षिणा, खंड २ रा, संपा. अ.अ. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, आवृत्ती तिसरी, २०००.

२५) संत (प्रा.) जान्हवी - कादंबरी एक वाङ्मय प्रकार, मोघे प्रकाशन, कोल्हापूर-२, आवृत्ती पहिली, १९७१.

२६) स्त्री साहित्याचा मागोवा - खंड २ रा, १९५१ ते २०००.

२७) हस्तक उषा - कादंबरी आणि मराठी कादंबरी समीक्षालेख, साहित्यसेवा प्रकाशन, औरंगाबाद, आवृत्ती पहिली, १९९३.

२८) हस्तक उषा - मराठी कादंबरीतील संवाद, सत्यकथा, नोव्हेंबर, १९९३.

२९) हातकणंगलेकर म.ना. - प्रदक्षिणा, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, विजयनगर, पुणे-३०.

३०) स्पिअरमन डायना-नॉव्हेल ॲण्ड सोसायटी रोलेज ॲण्ड केगन पॉल, लंडन, १९६६.

३१) Morgaon Charles Dailogue - In Novels and Plays.

# नियतकालिके

१) दक्षिण महाराष्ट्र साहित्य पत्रिका - संपा. चंद्रकुमार नलगे, वर्ष १८, अंक तिसरा ऑक्टो./नोव्हें./डिसें., १९९७.

२) दीपमाला दिवाळी अंक, २००८.

३) महाराष्ट्र साहित्य पत्रिका - कुलकर्णी गो.म., जुलै-डिसेंबर, १९८०.

४) सकाळ : वर्तमानपत्र, ९ सप्टेंबर, २००७.

# मुलाखत

## संध्या देशपांडे यांची अभ्यासकाने घेतलेली मुलाखत

नमस्ते मॅडम,

**प्रश्न** आपण लेखनाला कधी सुरूवात केली ?

**उत्तर** शाळेत असताना एक-दोन एकांकिका लिहिल्या होत्या. त्यानंतर १९८२ पासून खऱ्या अर्थाने लेखनाला सुरूवात केली.

**प्रश्न** कादंबरी, नाटक, एकांकिका या फॉर्ममध्ये तुम्ही लेखन केलेत, यातला कुठला फॉर्म तुम्हांला अधिक आवडतो ?

**उत्तर** नाटक हा माझा सर्वात आवडता फॉर्म आहे.

**प्रश्न** आपल्या लेखनापाठीमागे प्रेरणा कोणती ?

**उत्तर** नाटक वाचनाची आवड होती व त्यातूनच नाटक लिहावं वाटलं. प्रारंभी अनुवादित नाटके लिहून त्यांचे प्रयोग केले व त्यातूनच स्वतंत्र नाटके लिहिण्याची प्रेरणा मिळाली. ती प्रेरणा मला माझ्या आईवडिलांकडून मिळाली.

**प्रश्न** लेखनासाठी किती वेळ देता ?

**उत्तर** एकटाकी लेखन करण्याची सवय असल्यामुळे एखादा विषय सुचला की तो पूर्ण केल्याशिवाय लेखणी खाली ठेवत नाही. मात्र कादंबरी हा विस्तृत साहित्यप्रकार असल्यामुळे ती लिहिण्यास दोन वर्षे लागली.

**प्रश्न** 'अश्वदा' ही तुमची पहिलीच कादंबरी आहे. नाट्यलेखन हा तुमचा पिंड असून तुम्ही कादंबरीकडे कशा वळलात ?

**उत्तर** महाभारतातील व्यक्तिरेखा वाचत असताना मला ययातीकन्या माधवी ही व्यक्तिरेखा खूप आवडली. हा विषय नाटकासाठी खूप मोठा होता. त्यामुळे या विषयावरती कादंबरी लिहावी वाटली व कादंबरी लिहिण्यास सुरूवात केली.

**प्रश्न** कादंबरी लिहित असताना कोणत्या ग्रंथांचा आधार घेतला ?

**उत्तर** ही कथा महाभारतात एकाच पानाची आहे. त्यामुळे कादंबरी लिहित असताना तत्कालीन संदर्भ व स्थलकोश यांचा आधार घ्यावा लागला. त्या स्थलकोशाच्या आधारे तत्कालीन स्थलांची माहिती मिळाली. माधवी व गालवाचा प्रवास कसा झाला असावा याचा अनुभव स्थलकोशातील स्थलांवरून मिळाला. त्याचप्रमाणे रंभा या व्यक्तिरेखेचा संदर्भ मिळविण्यासाठी पुराणचित्र कोश वाचला.

**प्रश्न** पौराणिक कादंबरी लिहित असताना काल्पनिकतेचा आधार घेतला जातो ? 'अश्वदा' लिहीत असताना तुम्ही तो कितपत घेतला ?

**उत्तर** 'अश्वदा' मध्येही काल्पनिकतेचा आधार घेतला आहे. त्यामध्ये मी लहान असताना घरात गोपद्मे काढली जात असत. त्याचप्रमाणे घरात काही वाईट बोलले की घरातील देवता ह्या नेहमी 'तथास्तु तथास्तु' म्हणत असतात. आपल्या कोणत्या शब्दाला त्या तथास्तु म्हणतील हे सांगता येत नाही. त्यामुळे नेहमी चांगले बोलावे असे वडील म्हणत. या गोष्टींचा नकळत कादंबरी लिहित असताना उल्लेख आला व ती कल्पना त्याठिकाणी अनुरूप वाटली. काशीला जात असताना ज्या ब्राह्मण स्त्रीचा उल्लेख आला आहे ती व्यक्तिरेखा काल्पनिक आहे. मात्र माधवीच्या मनातील घुसमट व अपत्याबद्दलची ओढ अधिक प्रभावीपणे मांडण्यासाठी या कल्पनेचा आधार घ्यावा लागला.

**प्रश्न** कादंबरीचे शीर्षक कसे सुचले ?

**उत्तर** या कादंबरीमध्ये अश्व मिळविण्यासाठी सत्यवती व माधवी या दोन स्त्रियांचा वापर करण्यात आला आहे. त्यामुळे अश्व मिळवून देणारी स्त्री ही 'अश्वदा' ठरते. 'अश्वदा' ही कादंबरीची नायिका आहे. म्हणून या कादंबरीला 'अश्वदा' हे शीर्षक देण्याचे ठरविले.

**प्रश्न** एक स्त्री म्हणून लेखनाला मर्यादा पडतात असे आपल्याला वाटते का ?

**उत्तर** मर्यादा पडत नाहीत. कारण आपल्या लेखनशैलीमध्ये प्रखर बळ असेल आणि लोकांच्या मनावर आपला विषय योग्यप्रकारे ठसवता आला तर मर्यादा पडत नाहीत. मात्र आत्मविश्वासाने त्या विषयावर लिहिणे महत्त्वाचे आहे.

**प्रश्न** महाभारतामध्ये अनेक स्त्री व्यक्तिरेखा आहेत ? माधवी हीच व्यक्तिरेखा तुम्ही का निवडली ?

**उत्तर** माधवी ही राजकन्या होती. चार पुत्रांची माता होऊन देखील तिला आई झाल्याचे समाधान मिळाले नाही. त्याचप्रमाणे त्याकाळात तिला योग्य तो न्याय मिळाला नाही. माधवीच्या मनातील तळमळ, घुसमट ही वाचकांच्या समोर मांडून निदान आतातरी तिला न्याय मिळावा यादृष्टीने ही व्यक्तिरेखा घ्यावीशी वाटली. तसेच माधवी ही महाभारतातील महत्त्वाची व्यक्तिरेखा असून देखील तिच्यावर फारसे लिखाण झाले नाही. त्यामुळे आजच्या काळात तिला न्याय मिळवून देण्याच्या दृष्टीने ही व्यक्तिरेखा निवडली.

**प्रश्न** आपले भविष्यातील लेखन विषयक संकल्प काय आहेत ?

**उत्तर** 'अश्वदा' नंतर 'सुलतान' ही माझी दुसरी कादंबरी प्रसिद्ध झाली आहे. त्यानंतर 'तुलसी' आणि सूर्यपत्नी 'स्वाहा' या पौराणिक स्त्री व्यक्तिरेखांवरती कादंबरी लिहिण्याचा संकल्प आहे.

**प्रश्न** लेखनाबरोबर संशोधन करण्याची इच्छा आहे का ?

**उत्तर** होय, '१९८५ नंतरचे सामाजिक नाटक' या विषयावर संशोधन करण्याचा विचार आहे.

**प्रश्न** तुमचे आवडते लेखक कोण आहेत ? आणि ते का आवडतात ?

**उत्तर** विजय तेंडुलकर आणि गिरीश कर्नाड हे माझे आवडते नाटककार आहेत. कारण त्यांनी आपल्या नाटकातून समाजातील ज्वलंत वास्तव चित्रित केले आहे आणि आपल्या नाटकातून सामाजिक प्रबोधन केले आहे.

**प्रश्न** आत्मचरित्र लिहिण्याचा विचार आहे का ?

**उत्तर** नाही. मात्र प्रसिद्ध हिंदुस्थानी संगीत गायिका गंगुबाई हनगल यांच्यावर लिहिलेले जीवनचरित्र लवकरच प्रकाशित होत आहे.

# संध्या देशपांडे यांचे

# छायाचित्र, स्वाक्षरी व संदेश



या निजेला पाठ नाही
या भुकेला पोट नाही
अंतरीच्या वेदनेला
या इथे प्रतिसाद नाही ।

कोण माझा? मी कुणाचा?
या इथे शेजार नाही
बध्द ओठी आज इथे
क्रांतीची भाषाच नाही ।

ज्या दिशेने सूर आहे
त्या दिशेला मार होते
जाकडे दिशांच नाही
मग इथे अंधार नाही ।

'शुभेच्छा'

Prof. V. Deshpande